

# वार्षीक अहवाल २०१५-१६

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.

# सन्माननीय संचालक मंडळ-२०११-१६



**श्री. संजय ढोरे**
B.A



**श्री. सुनिल चाफले**
M.Sc. (Agri.) A.H.D.



**श्री. चैतन्य डुंगळे**
C.A.
[illegible]



**श्री. सुरेश भगत**
M.Com., LL.B.
तज्ञ संचालक



**श्री. अनिल डुंगळे**
मुख्य कार्यकारी अधिकारी



**श्री. शरद बोकसे**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी



**श्री. हरिश नाशिरकर**
[illegible]




**श्री. मनिष गोडखे**
[illegible]



**श्री. राजेश वंड**
[illegible]



**श्री. सुरेश गावंडे**
[illegible]



**श्री. विजय ढोबे**
[illegible]



**श्री. राहुल आमले**
वसुली अधिकारी
अमरावती




**सौ. वैशाली पुंड**
[illegible]



**श्री. शैलेश यादव**
[illegible]



**श्री. योगेश बोरे**
[illegible]



**सौ. वैशाली भटकर**
[illegible]



**सौ. किरण दिवाण**
[illegible]



**श्री. आशिष फोकमारे**
[illegible]



**श्री. अमोल चित्रे**
[illegible]

# निमंत्रण

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि.,
अमरावतीची

**वार्षिक साधारण सभा**

रविवार, दि. ११/०९/२०१६

**रोजी सकाळी ११ वा.**

**राजवाडा सभागृह, हॉटेल गौरी इन,**

मोर्शी रोड, अमरावती
येथे आयोजित केलेला आहे.
सभेची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर
**स्नेहभोजन** कार्यक्रम आयोजित केला आहे.
*यासाठी हे आग्रहपूर्वक निमंत्रण.*

•विनीत•

**संचालक मंडळ**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि.,
अमरावती
अमरावती.



# सर्व सभासदांना विनम्र आवाहन

* अद्यापपर्यंत ज्या सभासदांना शेअर सर्टीफिकेट मिळाले नाही त्यांनी त्वरीत कळवावे.
* ज्या सभासदांनी अजुनपर्यंत बचत खाते सुरु केले नाही, त्यांनी बचत खाते सुरु करुन घ्यावे, जेणेकरुन बँकेतर्फे भागभांडवलदारांना मिळणारा डिव्हीडंट बचत खात्यामध्ये जमा करणे सोईचे होईल, सद्या डिव्हीडंट वारंट प्रत्येक भागधारकास घरच्या पत्त्यावर पाठविण्यात आले आहे.
* आपला पत्ता व वारस इत्यादी मध्ये बदल झाला असल्यास बँकेस कळवावे, म्हणजे दफ्तरात त्याप्रमाणे योग्य नोंद करता येईल.
* आपण आपल्या बँकेतील विविध ठेव योजनांचा लाभ घ्यावा व इतरांना ठेवी ठेवण्यास प्रवृत्त करावे आणि संस्थेच्या प्रगतीस हातभार लावावा, ही विनंती.
* मुदती ठेवीवर रु. १०,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त व्याज मिळत असल्यास बँकेस व्याजाच्या रकमेच्या १०% इतका आयकर भरणे अनिवार्य झालेले आहे. कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे ज्या सभासदांनी पॅन नंबर दिलेला नसेल त्यांचा २०% इनकम टॅक्स कापावयाचा आहे. त्यामुळे सर्व सभासदांनी आयकर लागत असेल किंवा नसेल तरी सुध्दा पॅन नंबर सादर करणे आवश्यक झालेले आहे. कृपया सहकार्य करावे.
* ज्या सभासदांना रु. १०,०००/- किंवा जास्त व्याज त्यांच्या जमा ठेवीवर मिळत आहे. परंतू त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे उत्पन्न रु. २,५०,०००/- पेक्षा जास्त नाही व वरिष्ठ नागरिकांसाठी रु.३ लक्षापेक्षा जास्त नाही ते फॉर्म नंबर १५ एच व १५ जी दरवर्षी एप्रिलमधे किंवा खाते उघडतांना देवून टॅक्स वाचवू शकतात.
* सर्व कर्जदार सभासदांनी कर्जफेड वेळेवर व मुदतीत करुन संस्थेस सहकार्य करावे.
* आपण ज्या कर्जदारास जामीन आहात ते कर्जदार कर्जाचे हप्ते वेळवर भरतात किंवा नाही याकडे कर्जदाराच्या जामीनदारांनी विशेष लक्ष द्यावयाचे आहे.



# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् वॉलकट कंपाऊंड, अमरावती.
फोन नं. : २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१)२५६६१५८
नोंदणी क्र. : एटीआय/बिएनके/(ओ)/३१२/९९/दि. ३१.०३.१९९९
आर.बी.आय./परवाना/व्ही.बी.आय.डी/नागपूर/एम.एच./००१२/दि. १६/६/२०००
Email - jijaubankamravati@gmail.com website : jijaubankamravati


सन्माननीय,
भागधारक सभासद, बंधु/भगिनींनो,
सस्नेह जय जिजाऊ !

क्र. जिजाऊ/वा.स.सा. सभा/५३२/२०१६
दिनांक : ११/०८/२०१६

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि. अमरावती ची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दिनांक ११-०९-२०१६ रोजी सकाळी ११ वाजता**, राजवाडा सभागृह, हॉटेल गौरी इन, मोर्शी रोड, अमरावती येथे खालील विषयानुसार कामकाज करण्याकरीता आयोजीत केलेली आहे, तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

संचालक मंडळाचे आदेशान्वये
अनिल जा. इंगळे
मुख्य कार्यपालन अधिकारी

**सभेची विषय पत्रिका :**

१) दिनांक २५ सप्टेंबर २०१५ रोजी झालेल्या १५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) इ. सन २०१५-१६(३१ मार्च २०१६) चा वार्षिक अहवाल, अंकेक्षित हिशोबाची पत्रके, ताळेबंद, नफा तोटा पत्रक मंजुर करणे.
३) इ. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात झालेल्या नफयाचे विनियोजनास मंजुरात प्रदान करणे.
४) बँकेचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक मंजुर करणे व सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा झालेल्या प्रत्यक्ष खर्चास मंजुरात देणे.
५) सन २०१६-१७ करीता बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविणे.
६) बँकेचे आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता संवैधानिक लेखापरिक्षकाची मा. सहकार आयुक्त यांचे यादी मधील सनदी लेखापालाची नियुक्ती करणे
७) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल व त्रृटी पुर्तता अहवालची नोंद घेणे.
८) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत लेखा परिक्षक नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
९) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात घेणे बाकी कर्ज प्रकरणांची माहीती घेणे.
१०) एकरकमी कर्ज परतफेड प्रकरणांना मंजुरी देणे.
११) बँकेच्या वार्षिक विकास आराखड्यास व दिर्घ मुदती विकास आराखड्यास मंजुरात प्रदान करणे.
१२) उपविधी दुरुस्तीस मान्यता प्रदान करणे.
१३) अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस अनुपस्थित असलेल्या सदस्यांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१४) मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

टिप :
१) गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्या तासा नंतर त्याच दिवशी त्याच विषयावर व त्याच ठिकाणी घेण्यात येईल, व सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) बँकेचे कामकाजाविषयी सभासदांना प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न लेखी स्वरुपात सभेपूर्वी ३ दिवस अगोदर पाठवावे व पोच घ्यावी.
३) बँकेच्या भागधारकांनी बचत खाते उघडून लाभांश /धनादेश बचत खात्यामध्ये जमा करावेत. बँकेत ज्या भागधारकांचे बचत खाते आहे त्यांच्या खात्यात कर्ज असल्यास कर्जाचे खात्यात लाभांश जमा केला जाईल.
४) भागधारकांनी वारसाची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी करावी व भाग प्रमाणपत्राकरीता अचूक पत्ता बँकेत नोंदवावा.
५) सर्व भागधारकांनी के.वाय.सी. ची पूर्तता करावी म्हणजे आपले फोटो असलेले ओळखपत्र आधार कार्ड, निवडणूक कार्ड, पॅन कार्ड तसेच रहिवासी असल्याचा दाखला संबंधित कागदपत्र बँकेस आजपर्यंत दिले नसल्यास, त्वरीत देऊन सहकार्य करावे.
६) बँकेच्या प्रती भागाचे मुल्य रु. २५/- वरुन रु. ५०००/- झाल्यामुळे अपुर्ण भागधारकांची यादी बँकेचे नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे व त्यांना लेखी स्वरुपात पत्र सुध्दा पाठविले आहे. करिता अपूर्ण भाग धारकांनी भागपुर्तता करण्यात यावी.

# - श्रध्दांजली -

सन २०१५-१६ आर्थीक वर्षात जे

सामाजिक, राजकिय, सहकारी चळवळीतील कार्यकर्ते, नेते

आपल्या बँकेचे सन्माननीय संचालक, सभासद व ठेवीदार,

हितचिंतक यांचे दुखःद निधन झाले त्यांना

बँकेतर्फे आदरपुर्वक अभिवादन करुन

त्यांना कृतज्ञतापूर्वक भावपुर्वक श्रध्दांजली !

::::

**जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि.,**

**अमरावती.**

# अध्यक्षाचे मनोगत......

सभासद बंधु भगिनींनो,

सस्नेह जय जिजाऊ,

आपल्या बँकेच्या १६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाच्यावतीने आपणा सर्वांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. बँकेच्या प्रगतीतील महत्वाचा दुआ म्हणजे बँकेचे सभासद, ठेविदार, कर्जदार यांनी जो विश्वास दाखविला त्यामुळेच बँकेची यशस्वी भरभराट होत आहे.

सहकार्य हा सहकारी चळवळीचा आत्मा आहे. आपले ज्ञान, सहकार्याची व सांघीक वृत्ती, कामाविषयीची आत्मीयता हेच आपल्याला यशोशिखर गाठण्यास मदत करु शकते आणि हिच आपल्या बँकेच्या आजवरच्या यशाची गुरुकिल्ली आहे. आपण समोरच्याला काय देतो ह्यापेक्षा समोरच्या व्यक्तीची गरज काय याचा बँक प्राधान्याने विचार करते आणि हेच बँकेच्या यशाचे गमक आहे. सर्वसामान्य माणूस हा बँकेचा केंद्रबिंदू असून त्याची आर्थिक सक्षमता हेच बँकेचे ध्येय आहे.

बँकेने फायनानशियली साऊंड अँड वेल मॅनेज्ड (FSWM) बँकेचे सर्व निकष पूर्ण केल्याने व्यवसायाच्या सर्व निकषावर संतुलित वाढ आणि चोख व्यवस्थापन यामुळे सातत्याने बँकेला 'अ' ऑडीट वर्ग मिळाला आहे. सन २०१५-१६ या आर्थीक वर्षात निसर्गाच्या अवकृपेमुळे पडलेला दुष्काळ व त्यामुळे झालेले शेतकऱ्यांचे नुकसान, बाजारातील व सर्व व्यवसायांमध्ये आलेली मंदी ह्यामुळे बँकांच्या एन.पि.ए. मध्ये वाढ होईल अशी सार्वत्रिक धारणा असतांना आपल्या बँकेने कर्जाची चांगल्याप्रकारे कर्ज वसुली करुन एन.पि.ए. चे प्रमाण ग्रॉस ६.२५% तर नेट ०% ठेवण्यात यश मिळविले आहे. बँकेच्या थकीत कर्जाचे विषय हाताळतांना त्यांच्या अडचणी समजावून घेऊन माणूसकिचा स्पर्श देण्याचा बँकेचा नेहमीच प्रयत्न असतो. मात्र हे करित असतांना बँक अडचणीत येणार नाही याची दक्षताही घेतली जाते. कधिकधी कर्जवसुली करतांना कर्जदार बांधव गैरसमज करुन घेतल्याने नाराजीही ओढवते तर वैयक्तीक संबंधही दुरावतात तरीसुद्धा हा धोका पत्करुनही एन.पि.ए.चे प्रमाण आर.बी.आय. ने ठरविलेल्या निकषापेक्षा कमी ठेवण्यात यश आले.

लहानमोठ्या उद्योजकांना, व्यापार उद्दीमांना, नोकरदारांना अर्थपुरवठा करतांनाच छोटे व्यावसायीक, पगारदार, शेतकरी यांच्याही गरजा भागविल्या जातात. घरबांधणी, सदनिका खरेदी, घरदुरुस्ती, गृहपयोगी व उपभोग्य वस्तुखरेदी, शैक्षणीक गरजा यासाठी सहज सुलभ कर्ज पुरवठा केला जातो. उद्योजक महिलांकरिता विशेष योजनेअंतर्गत रु. २.०० लक्ष पर्यंत फक्त १०% दराने कर्ज पुरवठा केल्या जातो. बँक एकीकडे खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकासाला हातभार लावत असतांनाच दुसरीकडे बँकेची आर्थीक स्थितीही अधिकाधिक मजबूत व खंबिर होत आहे.

आर.टि.जि.एस./एन.ई.एफ.टी. सारख्या अत्याधुनिक सुविधा ग्राहकांना उपलब्ध करुन दिल्या आहेत तसेच ए.टी.एम. कार्ड ज्याद्वारे संपूर्ण देशभरातील एक लाखाहून अधिक ए.टि.एम. मधून ग्राहकांना पैसे काढण्याची विनामुल्य सूविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. त्याकरिता एस.बी.आय. सोबत करारनामा करण्यात आलेला

आहे. संपूर्ण शाखा कोअर बँकींग प्रणालिने सुसज्ज असून ग्राहक आपल्या कुठल्याही शाखेतून व्यवहार करु शकतात. बँकेने एस.एम.एस. बँकींग सुविधा उपलब्ध करुन दिल्याने ग्राहकांना खात्यावरील व्यवहार तसेच विशेष सुचना सुध्दा दिल्या जात आहेत. जिजाऊ बँकेने अॅप सुरु करुन चालू घडामोडी ग्राहकापर्यंत पोहचविल्या आहे.

बँकेने सामाजिक मूल्य जपण्यासाठी निरनिराळ्या सामाजीक क्षेत्रात काम करुन समाजऋण फेडण्याचा अंशत: प्रयत्न केला आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या व त्यांच्या कुटुंबियाची झालेली वाताहत ह्या बाबीचा विचार करुन बँकेच्या मागील आमसभेत ठरल्याप्रमाणे, शेतकरी पुत्र ह्या नात्याने सन २०१४-१५ मधील अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ११९ आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या घरी, दिवाळीपूर्वी जाऊन कुठलाही गाजावाजा न करता प्रत्येक कुटुंबास रु. ५०००/- प्रमाणे घरपोच मदत संचालकांनी नेवून दिली. सभासदांनी घेतलेल्या ह्या निर्णयाचे समाजाने व वृत्तपत्राने कौतुक केले. शेतकऱ्यांच्या भविष्यातील येणाऱ्या संकटावर सर्वांगिण विचार करण्याकरीता दि. २०-०३-२०१६ रोजी अभियंता भवन, अमरावती येथे मा.अॅड. शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर, संस्थापक अध्यक्ष, मराठा सेवा संघ ह्यांचे उपस्थितीत राज्यस्तरीय शेतकरी परिषद घेण्यात आली.

राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊ ह्यांच्या जन्मोत्सव सार्वजनिक स्वरुपाचा व्हावा ह्याकरिता बँकेने स्वखर्चाने बसविलेल्या राष्ट्रमाता माँ जिजाऊच्या पुतळ्याजवळ, कॅम्प अमरावती येथे जन्मोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमास अमरावतीच्या महापौर श्रीमती रिना नंदा, विभागीय आयुक्त राजुरकर साहेब, मनपा आयुक्त चंद्रकांत गुडेवार, माजी आमदार सुलभा खोडके आदी मान्यवर हजर होते. ह्या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

२०१५-१६ ह्या आर्थीक वर्षात अमरावती शहरातील साईनगर, मोतीनगर शाखा तर चांदुर बाजार, नागपूर येथील शाखा सुरु करण्यात आल्या. नागपूर येथील शाखेचे उद्घाटन मा.नामदार नितीनजी गडकरी, केंद्रिय भूपृष्ठ परिवाहन व जहाज बांधणी मंत्री, नवी दिल्ली यांचे हस्ते झाले. ह्याप्रसंगी मा.शिवश्री अॅड. पुरुषोत्तम खेडेकर अध्यक्षस्थानी होते. बँकेच्या एकूण ११ शाखा असून पुढील वर्षापर्यंत १५ शाखा व एकूण व्यवसाय ३०० कोटीच्या वर असे उद्दीष्ट आपणा सर्वांच्या मदतीने पूर्ण करण्याचे बँकेने ठरविले आहे. ध्येयवादी, प्रामाणीक, प्रयत्नवादी, व्यवहारज्ञानी, वस्तुस्थितीला समजून वागणारा व भविष्यातील संभाव्य घडामोडीचे वेध घेण्याचे चातुर्य असलेला आपल्या बँकेचा अधिकारी/ कर्मचारी वर्ग सातत्याने अप-डेट रहावा म्हणून प्रशिक्षण वर्ग सातत्याने सुरु असतात. तसेच त्यांच्या कल्याणाकरिता आवश्यक त्या सोई सुविधांकडेही आवर्जुन लक्ष दिल्या जाते.

या आर्थिक वर्षामध्ये बँकेला विविध मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्यात त्यामध्ये लॉर्ड बुध्दा चॅनलचे संचालक श्री. भैय्याजी खैरकार, नागपूर, अमरावती मनपाचे आयुक्त श्री. चंद्रकांतजी गुडेवार, श्री संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र. कुलगुरु मा.डॉ. जयकिरणजी तिडके इत्यादी प्रमुख होते.

बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक दर पाच वर्षांनी लोकशाही पद्धतीने होत असून ह्यावर्षी आपल्या बँकेची निवडणूक व्हावयाची आहे. सहकार खात्याच्या निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लवकरच सूचना जाहीर होतील. बँकेच्या आतापर्यंतच्या सर्व निवडणूका बिनविरोध झालेल्या आहेत. बँकेने नेहमीच खर्चात, संचालकांनी कोणताही भत्ता न घेता काटकसर करुन दरवर्षी उत्कृष्ट नफा कमावलेला आहे. तसेच बँकींग व्यवसायाबरोबर 'आर्थिक' व 'सामाजिक' हितही जपलेले आहे.

बँकेच्या यशामध्ये जिजाऊ बँकेचे सन्माननीय भागधारक, बँकेचे ठेविदार, खातेदार, व्यापारी, उद्योजक, दैनंदिन ठेवी जमा करणारे दैनिक संग्राहक, अधिकारी, कर्मचारी वर्ग, कर्जाची नियमीत परतफेड करणारे सभासद, ग्राहक व सर्व क्षेत्रातील हितचिंतक यांचा बहुमोल वाटा असून त्यांचे ऋणनिर्देश करणे हे माझे कर्तव्य समजतो.

तसेच रिझर्व बँक ऑफ इंडिया यु.बि.डी. नागपूर, जिल्हा उपनिबंधक, तालुका उपनिबंधक, तसेच कार्यालयातील कर्मचारी वृंद, सहकारी असोसिएशन व फेडरेशन यांचे सकारात्मक सहकार्य बँकेला सातत्याने लाभत आहे. याबद्दल मन:पूर्वक आभार. बँकेचे सर्व सन्माननिय संचालक, यांनी वेळोवेळी समिती सभा व संचालक मंडळ सभांना उपस्थित राहून आपले मत नोंदवून दिलेल्या भरघोस सहकार्याबद्दलआभार. मराठा सेवा संघ व त्यांची ३२ कक्ष, सामाजिक संस्थेच्या सर्व सभासदांनी बँकेला मदत केल्याबद्दल आभार. सर्व वृत्तपत्र संपादक, जिल्हा प्रतिनिधी यांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बँकेला सहकार्य प्राप्त झाले त्यांचे सुद्धा आभार. बँकेच्या यशात सहभागी प्रत्येक ज्ञात व अज्ञात हितचिंतकाचे मन:पूर्वक आभार.

सहकार्याच्या अपेक्षेत ! सदिच्छापूर्वक अहवाल सादर

*जय जिजाऊ ! जय शिवराय !! जय सहकार !!!*

संचालक मंडळाच्या वतीने
आपला स्नेहांकित
**अरविंद दत्तात्रय गावंडे**
अध्यक्ष
जिजाऊ कर्मर्शियल को-ऑप. बँक, लि. अमरावती.



विदर्भ बँक असोसिएशन तर्फे द्वितीय पुरस्कार स्विकारतांना मा. अनिल टाले, उपाध्यक्ष, सौ. किरणताई महल्ले, श्री. शरद बंड व श्री. संजय डोरे, संचालक


# बँकेची आर्थीक प्रगती

**भागभांडवल :**


सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये बँकेच्या भागभांडवलामध्ये तसेच सभासद संख्येमध्ये वाढ झालेली आहे. वाढी संबंधातला तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | सभासद संख्या | वाढ % | भागभांडवल | वृद्ध % |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | ५६९० | १०.०६ | ५४०.४० | १२.६६ |
| २०१५-१६ | ६१९० | ८.७९ | ६२२.८० | १५.२५ |
| प्रत्यक्ष वाढ | ५०० | – | – | |

जिजाऊ बँकेचे सभासद




जिजाऊ बँकेचे भागभांडवल रक्कम (रु. लक्ष)





| आर्थिक वर्ष | सभासद संख्या | भाग भांडवल |
|---|---|---|
| 2015-16 | 6190 | 622.80 |
| 2014-15 | 5690 | 540.40 |
| 2013-14 | 5170 | 479.76 |
| 2012-13 | 4564 | 419.11 |
| 2011-12 | 4273 | 375.75 |

**ठेवी :**

हा आर्थिक वर्षामध्ये ठेवी रु. १५४९३.०३ लक्ष झालेल्या आहेत. ठेवींमध्ये होणारी वाढ ही ८.३८ टक्के आहे.

जिजाऊ बँकेच्या ठेवी (रू. लक्ष)




जिजाऊ बँकेची प्रगती व सांपत्तीक स्थिती खालील तक्त्यावरुन अधिक स्पष्ट होईल. आकडे रु. लक्षात

| वर्ष | सभासद | भागभांडवल लक्ष रु. | राखीव व इतर निधी लक्ष रु. | ठेवी लक्ष रु. | कर्ज लक्ष रु. | गुंतवणूक लक्ष रु. | खेळते भांडवल लक्ष रु. | निव्वळ नफा लक्ष रु. | अभिप्राय | [illegible] | [illegible] | ऑडिट वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ४२७३ | ३७६ | १६६३ | ७६८३ | ५४३३ | ३६६० | १०३८१ | ७८.८१ | १५% लाभांश | २१.५३% | ४८० | 'अ' |
| २०१२-१३ | ४५६४ | ४१९ | १४२८ | ९५०१ | ६३१७ | ४०८० | ११६९४ | १७८.८५ | १५% लाभांश | २८.८२% | ५१६ | 'अ' |
| २०१३-१४ | ५१७० | ४८० | १८१९ | १२३१४ | ७३७६ | ५१६४ | १४८८५ | १७२.४३ | १५% लाभांश | २२.६३% | ५०४ | 'अ' |
| २०१४-१५ | ५६९० | ५४० | २०१६ | १४१९४ | ८३१४ | ७०४४ | १७०११ | १८४.८२ | १५% लाभांश | २२.४६% | ५१३ | 'अ' |
| २०१५-१६ | ६१९० | ६२३ | २०३४ | १५४९३ | १००५४ | ६७५३ | १८७३८ | १७५.११ | १२% (प्रस्तावित) | २२.४७% | ६२८ | 'अ' |

## ठेवीदारांची सुरक्षिततेकरीता विमा योजना :

ठेवीदारांच्या ठेव सुरक्षेकरिता रिझर्व बँकेच्या उपक्रमाअंतर्गत ठेव विमा आणि कर्ज हमी महामंडळाचे प्रिमियम नियमितपणे बँक जुन व डिसेंबरच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या सर्व ठेवींवर अर्धवार्षिक हप्त्याने विना प्रिमियम जमा करते. अहवाल वर्षात रु. १५.६७ लक्ष प्रिमियम भरलेला आहे.

## बँकेची इतर बँका व शासकीय प्रतिभुतीमधील एकुण गुंतवणूक

रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार २१.५०% गुंतवणूक ही शासकीय प्रतिभुतीमध्येच करणे अनिवार्य आहे. अहवाल वर्षात बँकेची एकुण गुंतवणूक रु. ६७५३.०४ लक्ष आहे. यापैकी शासकीय प्रतिभूतीमधील गुंतवणूक रु. ५५८६.९१ लक्ष, विविध बँका मधील गुंतणूक रु. ११६६.१३ लक्ष आहे. मागील आर्थिक वर्षामध्ये बँकेच्या एकुण गुंतवणूकीवर रु. ५३९.१६ लक्ष रुपये इतके व्याज मिळाले आहे.







## अहवाल वर्षातील कर्ज वितरण :

बँकेचे अहवाल वर्ष अखेर ३२९९ सभासदांना एकूण रु. १००५४.०९ लक्ष कर्ज वाटप केलेले आहे. मागील वर्षाच्या तुलनेमध्ये रु. १७३९.४७ लक्ष (२०.९२%) वाढ झालेली आहे.

## बँकेची कर्ज प्रकारानुसार कर्ज वाटणी खालील प्रमाणे आहे.

(आकडे लक्षात)

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कॅश क्रेडीट | १३०३.६२ | १३४२.२७ | १०२१.८६ | २०४३.७६ | २६४१.४१ |
| २. | गृह तारण | १०५२.६५ | ८७९.६३ | ८५३.०७ | ८३९.७६ | १०९७.५२ |
| ३. | वैयक्तिक तारण | ९२६.८३ | ११०१.७२ | १०३३.४८ | ७४२.७६ | ५५१.२८ |
| ४. | एमएसएमई. (Service) | २३७.९८ | २५०.०३ | ४५०.६५ | ७३२.६७ | ११९८.१४ |
| ५. | वाहन कर्ज | ५४४.७५ | ५५४.८० | ५४८.९६ | ५४७.४३ | ४८४.१४ |
| ६. | वैयक्तिक | ६६.७४ | ९४.५४ | १८४.११ | २१४.४१ | २११.३० |
| ७. | मुदतीठेव तारण | १६७.६९ | २४५.८३ | ३२५.४१ | ३२७.११ | ३११.६१ |
| ८. | NSC/KVP वरील कर्ज | १९.०३ | ५८.४५ | २२.२३ | ९.२१ | १७.३५ |
| ९. | इतर स्टाफ कर्ज | ०.४४ | ०.८० | ०.४७ | ----- | ८.५७ |
| १०. | शेती कर्ज | ४१८.५७ | ५२३.५१ | ६३५.४० | ७११.१६ | ८४८.०१ |
| ११. | शैक्षणिक कर्ज | ३२.८५ | २९.४५ | ३०.९४ | ३५.४३ | ४४.६८ |
| १२. | सोने तारण कर्ज | १९५.९३ | ३६८.८५ | ५०७.६३ | ६२४.०५ | ६०२.७३ |
| १३. | मालमत्ता तारण कर्ज | ३४८.३० | ४००.१० | ६८४.६८ | ५०९.८८ | १३८७.८३ |
| १४. | ओडी एफ.डी.आर. | ३५३.३१ | २८७.३९ | २०२.०८ | २०८.४४ | १७६.११ |
| १५. | एमएसएमई.MFG | -- | ९३.२० | ३७४.७९ | २२५.६७ | ३७५.७३ |
| | एकूण | ५४३६.५० | ६३२६.६४ | ७३७५.७६ | ८३१४.६२ | १००५४.०१ |
| | कर्जामध्ये झालेली वाढ | १८% | १६.२५% | १६.७७% | १२.७३% | २०.९२% |



**कर्ज वितरणाची महत्तम मर्यादा :**

एका व्यक्तीला व व्यक्ती समुहाला (Group) महत्तम सिमा बांधलेली असते जी आपल्या बँकेने १५-१६ या आर्थिक वर्षाकरीता १०० लक्ष व रु. ३०० लक्ष अशी कायम ठेवली आहे.

**संशयीत व बुडीत कर्जासाठी तरतूद :**

मागील वर्षापर्यंत बँकेची संशयीत व बुडीत कर्जासाठीची तरतूद रु. १,०३१/- लक्ष इतकी होती परंतू बँकेस २००६ पासून ते २०११ पर्यंतचा अतिरिक्त आयकर रु. ४४१.४८ लक्ष भरावा लागला. बँकेने केलेल्या अपिलामध्ये रु. १००.५० लक्षापर्यंतचा आयकर परत मिळविण्यात यश आले. परंतू राहिलेला आयकर रु. १८२.८२ लक्ष एकदम भरावा लागला. यासाठी बँकेने आपल्याकडे असलेली संशयीत व बुडीत कर्जासाठीची तरतूद वापरून बँकेची बॅलन्सशिट पूर्णपणे स्वच्छ केली आहे.

**सामोपचार पध्दतीने कर्ज परतफेड करणे :**

बँक दरवर्षी महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार काही अती थकीत खात्यामध्ये सामोपचार पध्दतीचा लाभ देवून वसुली केलेली आहे. चालु वर्ष एकुण ३ कर्जदार सभासदांना सदर योजनेचा लाभ मिळालेला आहे. सभासदांनी फक्त अती अडचणीच्या अवस्थेमधेच सामोपचार पध्दतीने कर्ज निरंक करावे.

**संचालक व त्यांच्या नातेवाईकाकडील कर्जे :**

बँकेने बँकेच्या संचालक मंडळातील कोणत्याही सदस्यास किंवा त्यांच्या नातेवाईकास कोणतेही कर्ज दिलेले नाही व अशा प्रकारे बँकेने रिझर्व बँकेच्या निर्देशाचे तंतोतंत पालन केलेले आहे.

**नफा व नियोजन :**

अहवाल वर्षामधे बँकेने कर्ज रक्कमेवर व्याज रु. १३६०.९० लक्ष, गुंतवणूकीवर रु. ५३९.९५ लक्ष व व्याज व्यतिरिक्तचे रु. ५१.४५ लक्ष असे एकुण रु. १९५२.३० लक्ष मिळविलेले आहेत. त्यामधुन ठेवीवरील व्याज, इतर खर्च करुन बँकेला चालु वर्षामधे रु. १७५.१९ लक्ष निव्वळ नफा झालेला आहे.

**इनकम टॅक्स व इतर टॅक्स :**

इनकम टॅक्स विभागाकडे अर्थिक वर्ष २००६-०७ ते २०१२-१३ पर्यंतच्या वर्षाकरीता अरिअर्स आयकराचा ४४१.४८ लक्ष भरणा केला होता. सदर मागणीचे विरुध्द बँकेने केलेल्या अपीलमध्ये, बँकेला सर्वच वर्षाकरीता चांगला प्रतिसाद व न्याय मिळालेला आहे. ज्यामुळे बँकेने भरलेला अतिरिक्त आयकरामधील रु. १००.५० लक्ष परत मिळाले आहे. बँकेने चालू आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता अग्रीम आयकर म्हणून रु. १०५ लक्ष व वर्ष २०१३-१४ करिता असेसमेंट प्रमाणे आलेला अतिरिक्त टॅक्स भरलेला आहे.

**लाभांष :**

बँक सातत्याने भागधारकांना १५% लाभांष देत आहे. परंतू चालु वर्षासाठी बँकेने १२% लाभांष प्रस्तावित केलेला आहे. बँकेने मुख्य कार्यालयाच्या बांधकामाची सुरुवात केलेली आहे. ह्या इमारतीच्या बांधकामासाठी प्रत्येक सभासदाचा वैयक्तीक सहकार्य अपेक्षीत आहे.

**संवैधानिक लेखापरिक्षण :**

आपल्या बँकेचे वर्ष २०१५-१६ साठीचे लेखापरिक्षण मे. झंझारी रमेशकुमार ॲन्ड कंपनी चार्टड अकाउंटंट, नागपूर या संस्थेने केलेले असुन त्यांनी आपल्या बँकेला ''अ'' ऑडीट वर्ग दिलेला आहे.

**कर्मचारी, संचालक प्रशिक्षण :**

बँकेच्या सक्षम व निकोप वाढीसाठी प्रशिक्षित संचालक, सोबतच प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी असावे लागतात या महत्वाच्या मुद्यावर बँकेने लक्ष केंद्रीत करुन चालु वर्षामधे प्रशिक्षणावर रु. १.१८ लक्ष इतका खर्च केलेला आहे. एकूण दहा कर्मचारी/अधिकारी यांना प्रशिक्षणाकरिता पूणे/नागपूर येथे पाठविण्यात आले होते. त्याचप्रमाणे सर्वच कर्मचाऱ्यांना ज्ञानवर्धनाचा लाभ होण्याचे दृष्टीने सुट्टीच्या दिवशी अमरावती येथे श्री. सुधिर मोरे, संचालक ब्लूम परसनॅलिटी डेव्हलपमेंट इन्स्टीट्यूट तसेच श्री. दिलीप मुलमुले मे. यूनिक सर्पोट प्रा.लि., नागपूर यांच्या तर्फे दिनांक २८-११-२०१५ व दिनांक २५-०६-२०१६ ला प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. सर्व कर्मचाऱ्यांच्या बढती करिता त्यांच्या व्यावसायिक माहितीचा आधार किती भक्कम आहे हे तपासण्यासाठी बँकेने १२-१२-२०१५ या दिवशी व्यावसायिक परिक्षेचे आयोजन केले. परिक्षा संपल्यानंतर लगेच कर्मचाऱ्यांना त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांसाठी श्री. अनिल इंगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उत्तरे दिली.

**पुरस्कार :**

विदर्भ अर्बन बँक को-ऑप. असोसिएशनच्या वतीने दि. ९ जुलै २०१६ रोजी २०१४-१५ चा जिजाऊ बँकेस रु. १०० ते ५०० कोटी पर्यंतच्या ठेवी असणाऱ्या बँकांच्या गटामधून उत्कृष्ट बँकेचा द्वितिय पुरस्कार प्राप्त झालेला आहे. ह्या कार्यक्रमास मा.नामदार श्री. नितीनजी गडकरी, केंद्रीय मंत्री हजर होते.

**सामाजिक जाणीव व उपक्रम :**

सामाजीक जाणीव ठेवून बँकेने विविध उपक्रम सुरु केलेले आहेत व त्याच उपक्रमा अंतर्गत बँकेतर्फे विदर्भातील शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या व त्यांच्या कुटुंबियांची झालेली वाताहत ह्या बाबींचा विचार करुन, शेतकरी पुत्र ह्या नात्याने सन २०१४-१५ मधील अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ११९ कुटुंबियांच्या दिवाळीपूर्वी प्रत्येक घरी जाऊन, कुठलाही गाजावाजा न करता प्रत्येक कुटुंबास रु. ५०००/- प्रमाणे घरपोच मदत देण्यात आली. भागधारकांना कोणत्याही प्रकारे नैसर्गीक अथवा अपघाती मृत्यू आल्यास त्यांच्या कुटुंबांना रु. १०,००० अर्थ साहाय्य म्हणुन दिले जातात. अहवाल वर्षात बँकेने १६ मृतभागधारकांचे वारसदारांना रु. १.६० लक्षाचे अर्थ सहाय्य मंजुर करुन वितरित करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे महिलांना उद्योगामध्ये प्राधान्य व प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने बँकेने महिलांकरीता जास्तीतजास्त कर्ज रु.२.०० लक्ष १०% व्याजदराने नविन उद्योग सुरु करण्याकरीता देण्याचे धोरण अवलंबिले आहे. चालु आर्थिक वर्षामधे बँकेने एकुण ०८ महिलांना या योजनेचा लाभ दिलेला आहे.

त्याचप्रमाणे आर्थिक वर्षामध्ये बँकेला मिळालेल्या चार नविन शाखा जसे नागपूर, साईनगर, मोतीनगर, व चांदूर बाजार यांचे उद्घाटन करुन बँकेने आपल्या शाखांची एकूण संख्या ११ शाखांवर नेलेली आहे.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बँकेने १२ जानेवारी हा दिवस 'जिजाऊ जन्मदिन सोहळा' म्हणून मोठ्या उत्साहाने व उल्हासाने साजरा केला.

ग्रामीण भागातील छोट्या छोट्या उद्योगांना चालना देण्याच्या उद्देशाने बँक प्रयत्नशील आहे.

जिजाऊ पुतळा परिसर सौंदर्यीकरणाचा लोकार्पण सोहळा बँकेतर्फे दि. २६-४-२०१५ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोरील माँ जिजाऊ पुतळा परिसरात संपन्न झाला. त्याच्या सौंदर्यीकरण व देखभालीचे काम बँकेने महानगरपालिकेकडून स्वतःकडे घेतलेले आहे.

**बँकेच्या ॲपचे लॉचींग :**

बँकेने सर्व सभासदांना बँकेमधे होणाऱ्या विशेष घटना, नविन यांत्रीक सुविधा इत्यादिंची घरबसल्या माहिती होण्याचे दृष्टीकोनातून बँकेच्या १६ व्या वर्धापन दिनी जिजाऊ बँकेच्या ॲपचे लॉचींग मनपा आयुक्त श्री. गुडेवार साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

**संचालक मंडळ सभा व विविध समिती सभा :**

संचालक मंडळाच्या नियमित सभा होत असून, अहवाल वर्षात खालील सभा झालेल्या आहेत.

| अ.क्र. | सभा | एकुण संख्या |
|---|---|---|
| १. | संचालक मंडळ | १३ |
| २. | कर्ज समिती | १२ |
| ३. | कर्मचारी समिती | ०५ |
| ४. | ए.एल.एम. समिती | ०५ |
| ५. | गुंतवणूक समिती | ०३ |
| ६. | एनपीए मॉनिटरिंग व कर्ज वसुली समिती | ०५ |
| ७. | ऑडीट समिती | ०३ |
| ८. | संगणक समिती | ०१ |
| ९. | बांधकाम समिती | ०१ |

## बँकेचे कर्ज वाटप रक्कम वर्गवारी खालील प्रमाणे आहे.

(रु.लक्ष)

| अ.क्र. | कर्ज रक्कम (रुपये मध्ये) | एकुण कर्जदार | टक्केवारी | कर्ज वाटप | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २५००० पर्यंत | ४१७ | १२.६४ | ४१४.०५ | ४.१३ |
| २. | २५००१ ते ५०००० पर्यंत | १०६७ | ३२.३४ | ६१८.१७ | ६.१४ |
| ३. | ५०००१ ते १००००० पर्यंत | ५५५ | १६.८२ | ४१०.८५ | ४.०८ |
| ४. | १००००१ ते २००००० पर्यंत | ३९५ | ११.९७ | ८२६.११ | ८.२१ |
| ५. | २००००१ ते ५००००० पर्यंत | ४५८ | १३.८८ | १४५१.८५ | १४.४३ |
| ६. | ५००००१ ते १०००००० पर्यंत | २३५ | ७.१२ | १५२८.६४ | १५.२७ |
| ७. | १०००००१ ते २०००००० पर्यंत | ८० | २.४२ | १२३७.२३ | १२.३० |
| ८. | २०००००१ ते २५००००० पर्यंत | २१ | ०.६४ | ५७५.८१ | ५.७२ |
| ९. | २५०००००१ ते ५०००००० पर्यंत | ३१ | १.१८ | १२२०.०५ | १२.८२ |
| १०. | ५००००००१ चे वरील | ३२ | ०.९७ | २००१.३३ | १९.९० |
| | एकुण | ३२९९ | १००.०० | १००५४.०९ | १००.०० |

**कर्ज वसुली :**


अहवाल वर्ष २०१५-१६ मध्ये बँकेने एकुण वसुली रु. २८७५.२३ लक्ष व त्यातील एन.पी.ए. वसुली रु. १३५२.२१ लक्ष केलेली आहे.

आर्थिक वर्षामधील कर्ज प्रकार निहाय कर्ज बाकी, कर्ज वितरण व कर्ज वसुलीचा तक्ता खालील प्रमाणे आहे. (रु. लक्षात)

| अ.क्र. | कर्ज प्रकार | एकुण कर्ज येणे बाकी | | | एकुण कर्ज वसुली मुद्दल/व्याज | एकुण कर्ज बाकी दि. ३१.०३.२०१६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१.०३.१५ ची बाकी | दि. ०१.०४.१५ ते दि.३१.०३.१६ पर्यंत कर्ज वितरण | एकुण | | A/c | Amt. |
| 1. | Agri. | 752.58 | 250.73 | 1003.31 | 200.57 | 134 | 802.74 |
| 2. | Edu. | 35.43 | 14.93 | 50.36 | 5.68 | 07 | 44.68 |
| 3. | Lap | 971.88 | 757.81 | 1729.69 | 341.86 | 120 | 1387.83 |
| 4. | MSME | 958.34 | 1032.10 | 1990.44 | 415.79 | 159 | 1574.65 |
| 5. | CC | 2013.76 | 828.79 | 2872.55 | 221.14 | 165 | 2649.41 |
| 6. | Spl | 742.76 | 49.77 | 792.53 | 241.25 | 213 | 551.28 |
| 7. | Dspl | 214.40 | 183.40 | 397.80 | 98.50 | 633 | 299.30 |
| 8. | M. | 347.43 | 356.59 | 704.02 | 219.89 | 552 | 484.13 |
| 9. | Housing | 831.76 | 426.42 | 1258.18 | 240.66 | 266 | 1017.52 |
| 10. | Other | 1216.28 | 914.16 | 2130.44 | 887.89 | 1009 | 1242.55 |
| | Total | 8314.62 | 4614.70 | 12929.32 | 2873.23 | 3299 | 10054.09 |

| व्यवसायिक प्रमाणके दि. ३१ मार्च २०१६ | | |
|---|---|---|
| विवरण | आर्दश प्रमाणके | प्रत्यक्ष प्रमाणके |
| भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) | किमान ९ % | १८.४०% |
| भागभांडवल वाढीचे प्रमाण | किमान २ ते ५ % | १५.२५% |
| रिझर्व्ह फंड | किमान ४ ते ६ % | १०.८५% |
| ठेवीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ८५ % | ८२.६८% |
| कर्जाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ६५ % | ५३.६५% |
| इतर बँकेची कर्जे व देणीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ३ % | ०.००% |
| गुंतवणूकीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण (S.L.R.) | किमान २१.५०% | ३६.०४% |
| एकुण उत्पन्नाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ११% | १०.४२% |
| व्यवस्थापकीय सरासरी खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल २.५% | १.०४% |
| ढोबळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ५% | १.९३% |
| निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | किमान १% | ०.९३% |
| ढोबळ एनपीएचे एकुण कर्जाशी प्रमाण (Gross NPA) | किमान १०% | ६.२५ |
| निव्वळ एनपीएचे एकुण कर्जाशी प्रमाण (Net NPA) | किमान ३% | ० |
| रिटर्न ऑन असेट | किमान १.५% | १.९३% |
| नेट इन्ट्रेस्ट मार्जीन | किमान ३% | ३.६०% |
| इन्ट्रेस्ट पेड | किमान ४ ते ५% | ८.३९% |
| सिडी रेशो (C.D. Ratio) | कमाल ६५-७०% | ६४.८९% |
| कॅश व बँक बॅलन्स (सिआरआर) | किमान ४% | ६.५०% |
| एकुण व्यवसायाशी कर्मचारी खर्च | कमाल १.५% | ०.७९% |
| प्रती सेवक व्यवसाय रुपये | किमान २५० लक्ष | ५११ लक्ष |
| | | |

## सन २०१५-१६ चे उत्पन्न व खर्च दर्शविणारा आलेख



| त्यक्ष प्रमाणके |
|---|
| १८.४०% |
| १५.२५% |
| १०.८५% |
| ८२.६८% |
| ५३.६५% |
| ०.००% |
| ३६.०४% |
| १०.४२% |
| १.०४% |
| १.९३% |
| ०.९३% |
| ६.२५ |
| ० |
| १.९३% |
| ३.६०% |
| ८.३९% |
| ६४.८९% |
| ६.४०% |
| ०.७९% |
| ..११ लक्ष |





# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

## अंदाज पत्रक : २०१६-१७

अ) उत्पन्न बाजू

(रुपये लक्षात)

| अ.क्र. | विवरण | अंदाजपत्रकातील सन २०१५-१६ ची तरतूद | सन २०१५-१६ चे प्रत्यक्ष उत्पन्न | अंदाज पत्रकातील उत्पन्नात वाढ/घट | सन २०१६-१७ चे अपेक्षीत उत्पन्न (अंदाज पत्रक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | व्याज (कर्ज व गुंतवणूक वरील) | २१२५.०० | १९००.८४ | - २२४.१६ | २२५०.०० |
| २. | कमिशन | १५.०० | २.३६ | - १२.६४ | १०.०० |
| ३. | इतर उत्पन्न | १६०.०० | ४९.१० | - ११०.९० | १९०.०० |
| | एकूण | २३००.०० | १९५२.३० | - ३४७.७० | २४५०.०० |

ब) खर्च बाजू

| अ.क्र. | विवरण | अंदाजपत्रकातील सन २०१५-१६ ची तरतूद | सन २०१५-१६ चे प्रत्यक्ष खर्च | अंदाज पत्रकातील खर्चात वाढ/घट | सन २०१६-१७ चे अपेक्षीत उत्पन्न (अंदाज पत्रक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | व्याजखर्च | १३५०.०० | १२२६.३१ | - १२३.६९ | १४००.०० |
| २. | कर्मचारी पगार खर्च (पगार, पी.एफ व इतर) | १५०.०० | १४८.५८ | - १.४२ | २००.०० |
| ३. | भाडे | ४२.०० | ३१.६५ | - १०.३५ | ४५.०० |
| ४. | विद्युत व पाणी खर्च | ७.०० | ७.२७ | + ०.२७ | १०.०० |
| ५. | पोस्टेज/टेलीफोन खर्च | ६.०० | ४.७८ | - १.२२ | ६.०० |
| ६. | स्टेशनरी/प्रिंटींग | ७.०० | २.०३ | - ४.९७ | १०.०० |
| ७. | न्युजपेपर व पेरीऑडिकल | ०.२५ | ०.११ | - ०.१४ | १.०० |
| ८. | रिपेअर चार्जेस | ३.०० | २.०८ | - ०.९२ | ५.०० |
| ९. | कन्व्हेअंस चार्जेस | ८.०० | १.८८ | - ६.१२ | १०.०० |
| १०. | क्लिअरिंग चार्जेस | २.०० | १.१२ | - ०.८८ | २.०० |
| ११. | विमा खर्च | २०.०० | २०.३८ | + ०.३८ | २५.०० |
| १२. | कार्यालय खर्च | ५.०० | ४.६४ | - ०.३६ | १०.०० |
| | | १६००.२५ | १४५०.८३ | - १५०.०७<br>+ ०.६५ | १७२४ |

| अ.क्र. | विवरण | अंदाजपत्रकातील सन २०१५-१६ ची तरतूद | सन २०१५-१६ चा प्रत्यक्ष खर्च | अंदाज पत्रकातील खर्चात वाढ/घट | सन २०१६-१७ चा अपेक्षीत खर्च (अंदाज पत्रक) |
|---|---|---|---|---|---|
| | मागील बाकी | १६००.२५ | १४५०.८३ | -१५०.०७<br>+ ०.६५ | १७२४.०० |
| १३. | शासकीय कर (आयटी इत्यादी)<br>अ) कर (अग्रिमकर रु.१०५लक्ष) | १००.०० | १०५.४८ | +५.४८ | १५०.०० |
| १४. | असोसिएटस् मेंबरशिप | १.५० | १.८३ | +०.३३ | २.०० |
| १५. | कार्यालयीन नोटीस/प्रसिध्दी/वसुली | ३.०० | २.१० | - ०.९० | ८.०० |
| १६. | कोर्ट केसेस खर्च | ३.०० | ४.५१ | +१.५१ | ६.०० |
| १७. | ऑडीट व इतर फी | ६.०० | ४.४२ | -१.५८ | १०.०० |
| १८. | सभा खर्च | १.०० | ०.३८ | -०.६२ | १.०० |
| १९. | आमसभा खर्च | ५.०० | ४.५४ | -०.४६ | ६.०० |
| २०. | झिज खर्च | २४.०० | २१.५७ | -२.४३ | ३०.०० |
| २१. | तरतुद | १५०.०० | ८०.७८ | -६९.२२ | १५०.०० |
| २२. | इतर खर्च | ८५.०० | ३७.२६ | -४७.७४ | ६३.०० |
| | अ) नविन शाखा नुतनीकरणखर्च | - | - | - | - |
| | ब) किरकोळ खर्च | - | - | - | - |
| | क) वसुली खर्च | - | - | - | - |
| २३. | कल्याण निधी | १०.०० | ५.९५ | -४.०५ | १०.०० |
| २४. | सेक्युरिटी सर्विस चार्जेस | १५.०० | १२.४३ | -२.५७ | २१.०० |
| २५. | खेळ व स्पर्धा | २.०० | ०.०० | - २.०० | २.०० |
| २६. | प्रशिक्षण | ८.०० | १.१८ | -६.८२ | ५.०० |
| २७. | कमिशन, बोकरेज | ४५.०० | २९.५८ | -१५.४२ | ४५.०० |
| २८. | एएमसी चार्जेस | २.०० | ०.२४ | -१.७६ | १.०० |
| २९. | सॉफ्टवेअर भाडे | १६.२५ | १३.२३ | -३.०२ | १६.०० |
| ३०. | नफा | २२३.०० | १७५.१९ | -४७.८१ | २००.०० |
| | एकूण | २३००.०० | १९५२.३० | - ३४७.७० | २४४०.०० |
| | | | | - ३५०.६७<br>+ ७.९७ | |

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (शरद भोकसे) | (अनिल इंगळे) | (राजेंद्र अढाऊ) | (अनिल टाले) | (अरविंद गावंडे) |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी | संचालक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

२०१६-१७
अपेक्षीत खर्च
(अंदाज पत्रक)

२४.००
०.००
२.००
८.००
६.००
०.००
१.००
६.००
०.००
.००
.००
–
–
–
००
००
००
००
००
००
००
०० 
०

डे)





# जिजाऊ बँकेचे सुधारित व्याजदर

| अ.क्र. | कर्ज प्रकार | मंजुर व्याज दर दि. ०१.५.२०१५ पासून लागू | | |
|---|---|---|---|---|
| | | अल्प मुदती (१ वर्ष आतील) | मध्यम मुदती (१ ते ५ वर्षापर्यंत) | दिर्घ मुदती (५ ते ७ वर्षापर्यंत) |
| १. | **व्यावसायिक कर्ज** | | | |
| | अ) रु. २ लक्षापर्यंत | | | |
| | ब) रु. २ लक्ष ते १० लक्षापर्यंत | १२% | १२% | १३% |
| | क) रु. १० लक्ष ते २५ लक्षापर्यंत | १३% | १३% | १४% |
| | ड) रु. २५ लक्षावरील | १४% | १४% | १५% |
| २. | अ) सुवर्ण कर्ज | १५% | १५% | १६% |
| | इ) रु. १ लक्षावरील कर्जाकरीता | १२% | -- | -- |
| ३. | वेअर हाऊस रिसीप्ट | १३% | | |
| ४. | **शेती कर्ज (विकास)** | १४% | -- | -- |
| | अ) रु. २ लक्षापर्यंत | | | |
| | ब) रु. १० लक्षापर्यंत | १२% | १२% | १३% |
| | क) रु. १० लक्ष ते २५ लक्ष पर्यंत | १३% | १३% | १४% |
| | इ) रु. २५ लक्षाचे वर | १४% | १४% | १५% |
| ५. | **कंत्राटदाराची कर्जे** | १५% | १५% | १६% |
| | अ) रु. २ लक्षापर्यंत | | | |
| | ब) रु. १० लक्षापर्यंत | १४% | -- | -- |
| | क) रु. १० लक्षावरील | १५% | -- | -- |
| ६. | **वाहन कर्ज** | १६% | -- | -- |
| | अ) रु. ६ लक्षापर्यंत (नविन गाडी) | | | |
| | ब) रु. ६ लक्षावरील (नविन गाडी) | -- | ११% | १२% |
| | क) जुनी कार/इतर वाहन | -- | १२% | १३% |
| | ड) दुचाकी वाहन | -- | १४% | -- |
| ७. | **पर्सनल कर्ज व (NSC/KVP/LIC)** | -- | १५% | -- |
| | च्या तारणावरील | | | |
| | अ) रु. २ लक्षापर्यंत | | | |
| | ब) रु. २ ते ५ लक्षापर्यंत | -- | १२% | -- |
| | क) रु. ५ लक्षावरील | -- | १२% | -- |
| | ड) लिलाव लोन (अनसिक्युअर्ड रु. ५०००० | -- | १४% | ११% |
| | (रु. ५०,०००/- चे वरील रु. २ लक्ष पर्यंत) | -- | १५% | -- |
| ८. | **घर खरेदी/बांधणी/दुरुस्ती** | १६% | | १६% |
| ९. | **शैक्षणिक कर्जे** | १२% | १४% | १५% |
| | अ) रु. ४ लक्षापर्यंत | | | |
| | ब) रु. ८ लक्षापर्यंत | -- | १४% | १५% |
| | क) रु. ८ लक्षावरील | -- | १५% | १६% |
| १०. | **लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी/मॉरगेज लोन)** | -- | १६% | १७% |
| | अ) रु. ५ लक्षापर्यंत | | | |
| | ब) रु. ५ लक्षावरील ते २५ लक्षापर्यंत | -- | १४% | १४% |
| | क) रु. २५ लक्षावरील कर्जासाठी | -- | १५% | १५% |
| | | -- | १६% | १६% |
| ११. | लोन अगेन्स्ट डिपॉझिट | जमा रकमेवर दिल्याजाणाऱ्या व्याजदरापेक्षा २% अधिक | | |
| १२. | नरदेशधारीतालीचे कर्ज (दि. १६ जुलै २०१६ पासून) | -- | १२% | -- |
| १३. | मेडीकल व्यवसायीकांचे कर्ज (५ जुलै २०१६ पासून) | | | |
| | अ) रुपये २५ लक्षापर्यंत | १२% | १२% | १२% |
| | ब) रुपये २५ लक्षाचे वर ५० लक्षापर्यंत | १३% | १३% | १३% |
| १४. | वर्धापन महिलांकरिता विशेष कर्ज योजना (रु. २.०० लक्ष पर्यंत) | १०% | १०% | - |

## ठेवीचे व्याज दर

| अ.क्र. | ठेवीचे प्रकार | जुने व्याज दर दि. ०१/०५/२०१५ पासूनचे | नविन व्याज दर दि. १६/०५/२०१६ पासून लागू |
|---|---|---|---|
| अ) | बचत ठेव खाते | | |
| | १) बचत ठेवी (रु. १ लक्षा पर्यंत ठेवीवर) | ४.००% | ४.००% |
| | २) रु. १०००००/- चे वर | ७.००% | ६.००% |
| ब) | करंट खाते | निरंक | निरंक |
| क) | मुदती ठेवी खाते | | |
| | १) ८ दिवस ते १४ दिवसापर्यंत | - | ५% (कमीत कमी गुंतवण्यात येणारी रक्कम रु. १५ लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक असावी) |
| | २) १५ दिवस ते ४५ दिवसापर्यंत | ६.००% | ५.००% |
| | ३) ४६ दिवस ते ९० दिवसापर्यंत | ६.५०% | ५.५% |
| | ४) ९१ दिवस ते १७९ दिवसापर्यंत | ७.५०% | ६.५०% |
| | ५) १८० दिवस ते १ वर्षापर्यंत | ९.००% | ८.००% |
| | ६) १ वर्ष ते ३ वर्षापर्यंत | ९.२५% | ८.२५% |
| | ७) ३ वर्षावरील कालावधीकरीता | ९.००% | ८.००% |

टिप:- १. जेष्ठ नागरीक/सहकारी संस्था/ट्रस्ट यांचे ठेवीवर वरील व्याज दराव्यतिरिक्त रु. ०.५० टक्के व्याजदर जादा दिला जाईल. याप्रमाणे संपुर्ण अतिरिक्त व्याजदराप्रमाणे जास्तीत जास्त व्याजदर ८.७५% राहील. बँकेच्या ठेव योजना जिजाऊ कम्पाउंडीग प्लॅन, जिजाऊ मंन्थली इन्कम, जिजाऊ डबल बेनीफिट योजना व जिजाऊ आर.डी. योजना यासारख्या ठेव योजना बँकेमध्ये सुरु आहे.

## बँकेचे कर्ज थकीत प्रकरणांचा गोषवारा दर्शविणारा तक्ता

## NPA Accounts dated ३१.०३.२०१६

| Sr. No. | Loan Type | Sub Std. | | D1 | | D2 | | D3 | | Total | | % of Gross NPA |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | A/c | Amt | A/c | Amt | A/c | Amt | A/c | Amt | A/c | Amt | |
| 1. | Main Branch | 45 | 168.33 | 36 | 89.44 | 9 | 57.81 | 52 | 75.11 | 142 | 390.69 | |
| 2. | Gadge Nagar | - | - | 44 | 146.03 | 1 | 0.36 | 77 | 42.22 | 122 | 188.61 | |
| 3. | Akola | 19 | 4.99 | 5 | 1.43 | 4 | 4.18 | 3 | 2.31 | 31 | 12.91 | |
| 4. | Daryapur | 2 | 10.35 | 5 | 21.45 | - | - | - | - | 7 | 31.80 | |
| 5. | Parat-wada | 2 | 3.15 | - | - | - | - | - | - | 2 | 3.15 | |
| 6. | Yavatmal | 2 | 0.82 | - | - | - | - | - | - | 2 | 0.82 | |
| | Total | 70 | 187.64 | 90 | 258.35 | 14 | 62.35 | 132 | 119.64 | 306 | 627.98 | 6.25 |